महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, लोकमान्य टिळक मार्ग,मुंबई - 400 001
Phone no. 22620390 / 22611871 Email : gmcgtmumbai@gmail.com

जा. क्र.शावैमम्/आस्था-१५२/जाहिरात प्रसिध्दी/सहाय्यक प्राध्यापक /9836 /२०२५ दि. 8 /१२/२०२५

# ‡ जाहीरात ‡

विषय:- वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय परिसर, मुंबई येथील विविध विषयातील सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे स्थानिक निवड मंडळामार्फत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर भरण्याबाबत.

संदर्भ :- वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक: एलईसी-१४२४/ प्र.क्र.२२८/वैसेवा-३ दि. १८ जुलै २०२४.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय परिसर, मुंबई येथील विविध विषयातील सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त असलेली पदे स्थानिक निवड मंडळामार्फत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर भरण्याकरीता इच्छुक पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छूक पात्र उमेदवारांकडून मागविण्यात येत असलेले अर्ज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई महानगर परिसर या संस्थेच्या www.gmcmumbai.org संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या कालावधीपर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (शासकीय सुट्टी वगळून) प्रशासकीय कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, मुंबई- ०१ येथे अर्ज स्विकारले जातील. उमेदवाराने शैक्षणिक अर्हता, अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडणे अनिवार्य राहील. तसेच मुलाखतीचा दिनांक तसेच नियुक्तीबाबतची माहिती संस्थेच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

(डॉ. जितेंद्र देशमुख)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
मुंबई- ४००००१

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई-४००००१

रिक्त पदांचा तपशील संवर्ग- सहाय्यक प्राध्यापक

| अ.क्र. | विषय | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | शरिररचनाशास्त्र (Anatomy) | २ | MD/MS/DNB in the concerned subject. | One year as Senior Resident in the concerned subject in a recognized/ permitted medical college after acquiring MD/MS Degree.<br><br>For DNB Candidates Senior Resident Experience will be Consider as per NMC Guidelines. |
| २ | शरीरक्रियाशास्त्र (Physiology) | ० | | |
| ३ | जीवरसायनशास्त्र (Biochemistry) | ० | | |
| ४ | औषधनिर्माणशास्त्र (Pharmacology) | २ | | |
| ५ | शरीर विकृतीशास्त्र (Pathology) | ० | | |
| ६ | सुक्ष्मजीवशास्त्र (Microbiology) | ० | | |
| ७ | न्यायवैद्यकशास्त्र (Forensic Science) | १ | | |
| ८ | रोग प्रतिबंधक व सामाजिक औषधवैद्यकशास्त्र (Prevention and Social Medicine) | २ | | |
| ९ | औषधवैद्यकशास्त्र (Medicine) | ० | | |
| १० | बालरोगचिकित्सा (Pediatrics) | ० | | |
| ११ | त्वचा व गुप्तरोग (Dermatology, Venereology & Leprosy) | ० | | |
| १२ | मनोविकृती (Psychiatry) | ० | | |
| १३ | क्षय व उररोग (Tuberculosis and Pulmonary Disease) | ० | | |
| १४ | शल्यचिकित्साशास्त्र (Surgery) | २ | | |
| १५ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र (Orthopedics) | ० | | |
| १६ | कान, नाक, घसाशास्त्र (Otolaryngologist - Ear, Nose, Throat ENT) | ० | | |
| १७ | नेत्रशल्यचिकित्सा (Ophthalmology) | ० | | |
| १८ | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र (Gynecology and Obstetrics) | ० | | |
| १९ | बधिरिकरणशास्त्र (Anesthesia) | ० | | |
| २० | क्ष-किरणशास्त्र (Radiology) | ० | | |
| २१ | दंतचिकित्साशास्त्र (Dentistry) | ० | | |
| २२ | इमर्जन्सी मेडिसीन (Emergency Medicine) | ० | | |
| | एकुण | ०९ | | |

महत्वाची टिप :-

१. उमेदवार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
२. उमेदवाराचे वय : नियुक्ती वेळेस शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमाप्रमाणे असावे.
३. सहाय्यक प्राध्यापक यांना करार पध्दतीने नियुक्तीसाठी त्या-त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहीत केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील.
४. मानधन: दरमहा ठोक मानधन प्रचलित शासकीय नियमानुसार
५. सदरील जाहिरातीमध्ये बदल /सुधारणा/रद्द करण्याचा पुर्ण अधिकार संस्था प्रमुखांना राहील.

नियम व अटी :-

१. करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत नियुक्तीच्या दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील. तथापी सदरहु पदावर नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवाराच्या पदस्थापनेत बदल करुन देण्याचे अधिकार आयुक्त यांना राहतील.
२. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्टात येईल.
३. करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापन, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.
४. वरीलप्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबावदा-यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.
५. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही, तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राह्य धरला जाणार नाही.
६. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तीक रजा अनुज्ञेय असतील.
७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे / माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
८. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.
९. उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र उमेदवारास नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणा-या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहीत विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्विकारला जाणार नाही.
१०. बिगर सेवानिवृत्त गटातून करार पध्दतीने नियुक्त होणा-या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.
११. अर्जदाराने संबंधित पदासाठी शारीरीक दृष्ट्या पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

१२. सदर जाहिरात मधील नमूद पदसंख्येत बदल करणे / सदरची जाहिरात पुर्णतः रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.

१३. नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणेबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठातांना राहतील.

१४. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१५. अर्जदाराचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१६. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. (मुलाखतीचे वेळापत्रक स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.) मुलाखतीला येतांना उमेदवारांनी सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मुळ कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक राहील.

(डॉ. जितेंद्र देशमुख)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
मुंबई- ४००००१